# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य / State: महाराष्ट्र  जिल्हा / District: मुंबई  पोलीस ठाणे / Police Station: लाप्रवि  पहिली खबर क्र. / FIR No.: 10  वर्ष / Year: 2025  दिनांक / Date: 27/02/2025

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988  कलमे Sections: 07
   (ii) अधिनियम Act ...  कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : / Occurrence of offence : वार / Day: गुरुवार  तारीख पासून / Date from: 24/02/25  वेळ / Time: 11:30  तारीख पर्यंत / Date to: 27/02/25  वेळ / Time: 14:10

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००  (2) ०३.०० ते ०६.००  (3) ०६.०० ते ०९.००  (4) ०९.०० ते १२.००  (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००  (7) १८.०० ते २१.००  (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची / Information received at P. S.  तारीख / Date: 24/02/2025  वेळ / Time: 19:30

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. / General Diary Reference : Entry No.: 47/25  तारीख / Date: 27/02/2025  वेळ / Time: 23:30

4. माहितीचा प्रकार Type of Information ...  लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ... / Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. / Chouki / Beat / O. P. Name and No. ...

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव / Address of Occurrence Name: २रा माळा, आरोग्य विभाग, ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, भायखळा (पूर्व) मुंबई - 400007
ठिकाणाचे नंबर / No. if any ...  गल्ली / Ward ...  रस्त्याचे नाव / Name of road ...
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण / Nearest identifiable place ...  गाव / Village ...  पोस्ट / Post ...  तालुका / Taluka ...  जिल्हा / Dist. ...  राज्य / State ...

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव / In case, outside the limit of this Police Station ...  तालुका / Taluka ...  जिल्हा / Dist. ...  राज्य / State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव / Name: मकसुद रशिद शेख
(b) वडिलांचे / पतीचे नाव / Father's / Husband's Name: रशिद शेख
(c) जन्म तारीख व वय / Date of Birth and Age: 53 वर्षे
(d) राष्ट्रीयत्व / Nationality: भारतीय  फोन नं. / Phone No.: 9619891317
(e) पारपत्र क्रमांक / Passport No. ...  दिल्याचा दिनांक / Date of issue ...  दिल्याचे ठिकाण / Place of Issue ...
(f) व्यवसाय / Occupation: नोकरी
(g) धर्म Religion: मुस्लीम  जात Caste ...  जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता / Address: रूम नं - 35 लतीफ पत्रेवाली चाळ, कोहराम नगर रोड, वांद्रा (पूर्व) मुंबई - 400051
गल्ली/सर्व्हे नं. / Ward ...  घर/नाव नं. / House Name No. ...  फोन/मो. नं. / Phone No. ...  पॅन नं. / Pan No. ...  वोटर्स नं. / Card No. ... 1
रस्त्याचे नाव / Road ...  जवळचे प्रसिद्ध ठिकाण / Nearest identifiable place ...  गाव / Village ...  पोस्ट / Post ...  पो. स्टे. / P. Stn. ...
तालुका / Taluka ...  जिल्हा / Dist. ...  राज्य / State ...  सध्याचा पत्ता / Present Address ...

1

माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदारांच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

अर्जुन रामलिंग निषाद, वय 37 वर्षे, नोकरी - श्रमिक, ई वार्ड (दुकस्ती) बि.एस.डी. भायखळा, मुंबई, रा.ठी - गंगाचाळ, सुभाष नगर नं 02, राम आश्र. डी.सी रोड नं 23 चकाला, महाकाली गुफा अंधेरी (पूर्व) मु-400093, मो.क्र. 8052264747



Scanned with OKEN Scanner

"फिर्याद"

दि. 27/02/2025

श्री. मकसुद रशिद शेख वय 53 वर्षे, धंदा-वॉचमन, राही- रूम 335, लतीफ पठवाली चाळ, बेहराम नगर रोड, वांद्रा (पूर्व) मुंबई-51, यांचा स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आलेली फिर्याद हिच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

27/02/25

(शुभदा मोरे)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
वरळी, मुंबई.

फिर्याद दिनांक २७/०२/२०२५

श्री. मकसुद रशिद शेख वय ५३ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी (सिक्युरटी) राठी : रुम क्र. १३५, लतिफ पत्रेवाली चाळ, गौसपाक बाबा झेंडा, बेहराम नगर, अे.के मार्ग, खेरवाडी, बांद्रा पूर्व, मुंबई मोबाईल क्र. ९६१९८९१३७१, आधार कार्ड क्र. ८०५४ ५५३ ४३४२

————————0000————

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर मी, माझी पत्नी नामे श्रीम. शहाना व मुलगी टेयबा यांच्यासह रहावयास आहे. मी अे वन, ओमकार या सिक्युरटी कंपनीचे मार्फतीने वॉचमनचे काम करतो. त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा व माझ्या कुटूंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

माझ्या जन्म प्रमाणपत्रामध्ये माझ्या नावाची नोंद **Maqsud** अशी झालेली आहे. सदर जन्म प्रमाणपत्राच्या कागदोपत्री माझ्या नावात बदल करण्याकरीता दिनांक २२/०८/२०२४ रोजी **Maqsood** या नावाने जन्म प्रमाणमध्ये नोंद होण्याकरीता माझे आधार कार्ड, पॅनकार्ड, श्रमकार्ड, जन्मदाखला, मतदान कार्ड अशी कागदपत्रे अर्जासोबत जोडून आरोग्य विभाग, ई वॉर्ड, भायखळा विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई येथे दिला होता. त्याकरीता मी सदर विभागास रु. १२/– इतकी फि भरलेली आहे. त्यानंतर मी केलेल्या अर्जाबाबत सदर विभागास जावून वारंवार चौकशी केली असता तेथील कर्मचारी टाळाटाळ करीत होते.

त्यानंतर दिनांक. ०९/०१/२०२५ रोजी जन्म प्रमाणपत्राची प्रत मिळाली, त्या प्रतीची पाहणी केली असता, त्यामध्ये माझे नाव **MAKSOOD** ऐवजी **MAQSUD** व माझे आईचे नाव **KHUSHNUDA** ऐवजी **KHUSMUDA** अशी चुकीची नोंदी केल्याचे दिसुन आले. त्यावेळी मी त्यांना माझे व माझ्या आईचे नाव चुकीचे असल्याचे दाखवून दिले असता, त्यांनी मला पुन्हा नवीन अर्ज करण्याकरीता सांगितल्याने मी लगेच दिनांक ०९/०१/२०२५ रोजी नावात बदल होण्याकरीता नवीन अर्ज दिला. त्याकरीता मी त्या अर्जासोबत त्या विभागाने दिलेल्या नवीन जन्म प्रमाणपत्राची प्रत, आधारकार्ड, पॅनकार्ड, श्रमकार्ड व जुने जन्म प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती दिल्या. मी दिनांक २०/०२/२०२५ रोजी आरोग्य विभाग, ई वॉर्ड, भायखळा विभाग येथील कर्मचारी अर्जून निषाद यांना भेटलो. त्यावेळी अर्जुन यांनी माझे काम करुन देण्याकरीता रु. ४,०००/– द्यावे लागतील असे सांगून माझेकडे लाचेची मागणी केली.

मला अर्जुन निषाद आरोग्य विभाग, ई वॉर्ड, भायखळा विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथील सरकारी कर्मचारी यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांचेविरूध्द दिनांक. २४/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयात येवून तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटुन माझी तक्रार सांगितली. त्याप्रमाणे त्यांनी माझे तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता तपासी अधिकारी म्हणून स.पो.आ शुभदा मोरे व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पो.नि. संतोष गुर्जेर यांची नेमणुक करून पुढील कारवाई केली व माझी तक्रार नेमण्यात आलेल्या पंचाच्या सहाय्याने माझे सांगण्यानुसार लॅपटॉपवर टंकलिखित केली.

मी केलेल्या तक्रारीनुसार दिनांक २५/०२/२०२५ रोजी मी, पोलीस पथक व शासकीय पंच असे आरोग्य विभाग, ई वॉर्ड, भायखळा विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई येथे जावून पडताळणी केली असता, अर्जून निषाद यांच्या प्रत्यक्ष भेटीकरीता गेले त्यावेळी अर्जून निषाद हे कामाच्या ठिकाणी मिळून न आल्याने इतर लोकसेवक यांच्यात झालेले संभाषण "अर्जुन कुठे भेटणार...तो जेवण करायला गेला आहे." सदर दिवशी लाचेची मागणी झाली नसल्याने सदर पडताळणी पुन्हा करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. माझे व अर्जुन निषाद यांचेमध्ये झालेले संभाषण तपासी अधिकारी स.पो.आ शुभदा मोरे यांनी त्यांचेकडील डि.व्ही.आर मशीनव्दारे मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनीमुद्रित करून घेतले. त्यानंतर स.पो.आ शुभदा मोरे यांनी मला लाचेच्या रक्कमेची सोय करण्यास सांगितले.

त्यानंतर दिनांक २७/०२/२०२५ रोजी माझे व श्री. अर्जून यांच्या प्रत्यक्ष भेटीच्या दरम्यान झालेले संभाषणामध्ये **"तुम्ही आले नाही परवा... त्यावर मी त्यांना "घरुन फोन आला होता, म्हणून निघून गेलो" त्यावर अर्जुन यांने मला "साडेतीन घेणार त्या पेक्षा कमी नाही...करणार ते" त्यावर मी त्यांना बोललो "तीन**

Scanned with OKEN Scanner

करतो'' त्यावर अर्जून निषाद यांनी ''नाही नाही त्यापेक्षा कमी नाही...अरे नाही करणार सर'' त्यावर मी त्यांना म्हणलो की ''दिड...मी आता देतो...दिड'' त्यानंतर अर्जुन निषाद त्यांनी मला ''दोन...दोन...कमीत कमी दोन तरी देवून जा...मी काम सुरु करतो'' माझे व अर्जुन यांच्यामध्ये झालेले संभाषण स.पो.आ शुभदा मोरे यांनी डि.व्ही.आर मशीनव्दारे मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनीमुद्रित केले.

स.पो.आ शुभदा मोरे, पो.नि. संतोष मोरे, पंच व पोलीस पथकातील अमंलदार आणि मला सापळा कारवाईच्या दृष्टीने घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या व लाचेच्या रक्कमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून माझे शर्टच्या वरील उजव्या खिशात ठेवली. स.पो.आ शुभदा मोरे यांनी डि.व्ही.आर मशीन चालू करुन माझ्याकडे दिला असता तो मी माझे शर्टच्या आतील बनियानला लावला. त्यानंतर मी, पोलीस पथक व पंच असे बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, भायखळा विभाग, मुंबई येथे जाण्याकरीता रवाना झालो. त्यांनतर मी श्री. अर्जुन याची भेट घेतली असता, ''काय झाले...(असे बोलून हाताच्या इशाऱ्याने लाचेच्या रक्कमेची मागणी केली) त्यावेळी मी त्यांना ''बाहेर देवू का?'' असे विचारले असता त्यावर अर्जुन निषाद यांनी ''नाही...नाही... नाही...तुम्ही इकडे या...थोडा वेळ बसा...पेपर काढून आणवे लागेल मला...किती आहेत'' असे विचारले व मेडीकल ऑफिसर हेल्थ (Health) या कक्षाच्या बाहेर येवून समोरील वॉर रुम क्र २८ असा कागद चिकटवलेल्या ठिकाणी आम्हास घेवून गेले. तेथे गेल्यावरती मी माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील लाचेची रक्कम अर्जूनच्या समोर हजर करुन ''दोन...तुम्ही बोले होते ना'' त्याने लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन मोजून सदरची रक्कम पॅन्टच्या पाठीमागील उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी त्या खोलीच्या बाहेर येवून लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत नियोजित इशारा केला. त्यावेळी पथकातील अधिकारी पो.नि संतोष गुर्जेर व अमलंदार यांनी त्यास अटकाव केले. त्यावेळी पो.नि. संतोष गुर्जेर यांनी पंच श्री. दिनेश यास अर्जून याने स्विकारलेली लाचेची रक्कम त्यांच्या ताब्यात ठेवण्यास सांगितले. सदरवेळी आमचेमधील झालेले संभाषण मला लावण्यात आलेल्या डि.व्ही.आर मधील मायक्रो एस.डी कार्डमध्ये ध्वनीमुद्रित केले व झालेल्या घटनेबाबत शासकीय मोबाईलव्दारे व्हिडिओ रेकॉर्डिंग व फोटो काढले.

स.पो.आ शुभदा मोरे व पो.नि. संतोष गुर्जेर यांनी अर्जुन निषाद यास ताब्यात घेऊन आरोग्य विभाग, ई वॉर्ड, भायखळा विभाग, मुंबई येथील वॉर क्र. २८ मध्ये अल्ट्राव्हाईटच्या प्रकाशाने त्यांच्या हाताची व जिन्स पॅन्टची तपासणी केली असता, त्यांच्या हातास व पॅन्टला अॅथ्रोसिन पावडरची चकाकी दिसून आली व त्यानंतर आम्ही पुढील कारवाईकरीता शासकीय वाहनाने ला.प्र.वि, वरळी, मुंबई कार्यालयास आलो.

तरी अर्जुन रामतिर्थ निषाद वय ३७ वर्षे, धंदा : नोकरी (श्रमिक ई वॉर्ड दुरुस्ती), आरोग्य विभाग, ई वॉर्ड भायखळा विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई यांनी माझेकडे जन्म प्रमाणपत्रामध्ये माझे व आईच्या नावात बदल करुन देण्याकरीता आपल्या पदाचा दुरुपयोग करुन स्वत:च्या फायदयाकरीता बेकायदेशीर मार्गाने रू. ४,०००/– लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ३,५००/– ठरवून रु. २०००/– रक्कमेची लाच स्विकारली म्हणून माझी लोकसेवक यांच्याविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मी मला मराठीतून वाचून हिंदीतून समजावून सांगितला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

२१/११/२५

( शुभदा मोरे ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ विना विलंब ........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........ — ........

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ — ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

1. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ — ........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

2. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळ व ठिकाणी कॉलम क्र ०७ मधील आरोपी नामे अर्जुन रामतिर्थ निषाद यांनी फिर्यादी यांच्याकडे जन्म दाखल्यात फिर्यादी व त्यांच्या आईच्या नावात बदल करून देण्याकरिता आपल्या पदाचा दुरुपयोग करून स्वतःच्या फायद्याकरिता फिर्यादी यांच्याकडून गैरमार्गाने रु 4000/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती 3500/- रु पैकी रु 2000/- रक्कमेची लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद करण्यात येत आहे.

3. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : स.पो.आ. शुभदा प्रतापराव मोरे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .......... Rank .......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

4. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge/Police Station
[signature] ३१/१/२५

संपूर्ण नाव Name शुभदा प्रतापराव मोरे
पदनाम Rank सहाय्यक पोलीस आयुक्त
तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. वरळी, मुंबई.
Posting
Code No. of I. O. ..........

5. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner